**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोदींत पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविण्याच्या योजनेस शासन मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: इबांका-२०१७/प्र.क्र.४८३/काम-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २२ नोव्हेंबर, २०१७.

**वाचा-**

(१) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम,१९९६.
(२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती)नियम,२००७.
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागशासन निर्णय भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४, दिनांक १.१२.२०१६.
(४) नियोजन विभाग शासन निर्णय डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दिनांक ५.१२.२०१६, आणि ३.३.२०१७.
(५) कामगार आयुक्त यांचे पत्र क्र. मइवइबांकाकमं/Essential Kit/२०१७/२२६ दिनांक ०३. ११.२०१७.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या व महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणा-या बांधकाम कामगारांची संख्या यामध्ये तफावत आहे.सदर तफावत कमी करण्यासाठी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना जाहीर करुन, बांधकाम कामगारांना नोंदणी करण्यासाठी आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, तरीपण राज्यातील अजूनही मोठ्या प्रमाणात बांधकाम संस्थाकडे कार्यरत बांधकाम कामगारांची मंडळाकडे नोंदणी होण्याचे प्रमाण समाधानकारक नाही. तसेच, अशा बहुतेक बांधकाम संस्थांमध्ये कार्यरत बांधकाम कामगार हे ग्रामीण भागातून रोजगार मिळविण्यासाठी शहराकडे येतात. अशा बांधकाम कामगारांजवळ दैंनंदिन वापराच्या अत्यावश्यक वस्तुंची कमतरता असते.सबब अशा अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणे या योजनेच्या माध्यमातून दैनंदिन वापराच्या वस्तुंची कमतरता भरुन काढण्यास तसेच बांधकाम कामगारांना मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी आकर्षित करण्यासाठी अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणे ही योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने दिनांक २२.९.२०१७ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ०५ अन्वये सुरु करण्याचे योजिले आहे आणि त्यास शासन मान्यता देण्याची संदर्भ क्र.५ येथील दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कामगार आयुक्त यांनी

शिफारस केली आहे. या पार्श्वभूमीवर सदर योजना कार्यान्वित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणे या योजनेस खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**<u>योजनेच्या अटी व शर्ती</u>**

**१.** मंडळाकडे नोंदणी जिवीत असलेले पात्र बांधकाम कामगार या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहतील. या पात्रताधारक कामगारांनी विहित नमुन्यातील मागणी अर्ज प्राधिकृत सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडे भरुन दिल्यानंतर अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविण्यात यावे.

**२.** पात्र बांधकाम कामगारांना पुरवावयाच्या अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) मध्ये खालील वस्तूंचा समावेश असावा.

(१) प्लॅस्टिक चटई ( Plastic Mat ) (२) मच्छरदानी (Mosquito Net ) (३) सोलर टॉर्च ( Solar Torch ) (४) जेवणाचा डबा ( Tiffin Box ) (५) पाण्याची बाटली ( Water Bottle ) (६) खांद्यावरील बॅग ( Sack ) (Outer bag ) (७) पत्र्याची पेटी ( Galvanise Trunk )

**३.** पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविण्या बाबत ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन, नोंदणीकृत, नामांकीत व अनुभवी संस्थेची निवड करावी.तसेच या संदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १.१२.२०१६ मधील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे. तसेच निविदा स्विकृती नंतर प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करावा.

**४.** अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) मधील पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंचे दर, पुरवठा, वाहतूक,
वितरण व सर्व करांसह निश्चित करण्यात यावे.

**५.** अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) च्या निविदा स्विकृत करण्यापूर्वी अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) मधील वस्तूंच्या दर्जाची शासन मान्य प्रयोग शाळेकडून तपासणी व खात्री करून घ्यावी व तसे प्रमाणपत्र तद्नंतरच अशा वस्तूंची पात्र लाभार्थ्यास वितरणाची कार्यवाही करावी.

**६.** संबंधित सहाय्यक कामगार आयुक्त यांनी रितसर प्रमाणित केलेल्या पात्र नोंदीत बांधकाम कामगारांच्या यादीनुसारच विहीत मुदतीचे आत अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) चा पुरवठा करण्यात यावा.

**७.** पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) प्राप्त झाल्याचे सरकारी कामगार अधिकारी यांनी खात्री करावी व पुरवठा केल्याची पोचपावती उपायुक्त कामगार यांना सादर करावी. उपायुक्त कामगार यांनी अशा सर्व लाभार्थ्यांचे साहीत्य प्राप्त झाल्याबाबतच्या पोच पावत्या पाहून खात्री करुन त्याबाबतचा अहवाल देयकाची अदायगी करण्याच्या प्रमाणपत्रासह महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई यांना सादर करावा व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने सदरहू अहवाल व उप आयुक्त कामगार यांचे देयक अदायगी करण्याचे प्रमाणपत्र पाहून,खात्री करुन पुरवठादाराचे देयके नियमानुसार प्रदान करावे.

८. अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरवठयाचा खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीतून भागविण्यात यावा.

९. सदर योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणी व देखरेखीचे काम कामगार आयुक्त यांनी पहावे.

**१०.** पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरवठा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करावी. कालावधी वाढविण्यास मान्यता देण्याचे अधिकार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास राहतील.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०१७११२२१५४२३९४३१० असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Shashank M. Sathe

Digitally signed by Shashank M. Sathe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6b4e6443f4621997398029547f71977c2d89e32e391d622c519f39893078c30b, cn=Shashank M. Sathe
Date: 2017.11.23 12:37:42 +05'30'

**(श. मा. साठे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. सर्व सन्मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य
२. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
४. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
५. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा) यांचे खाजगी सचिव.
६. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग

७. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
८. समितीचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त)
९. कामगार आयुक्त, मुंबई / अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.
१०. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
११. सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
१२. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
१३. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. सहसचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१६. निवडनस्ती (कामगार-७).